# शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यासाठी 'संवाद वारी' हा उपक्रम महत्त्वाचा : मुख्यमंत्री शिंदे

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

**माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने शासकीय योजनांच्या प्रचार प्रसिद्धीसाठी 'संवाद वारी' हा उपक्रम राबवला जात आहे. या माध्यमातून राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम असलेला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ही प्रचार प्रसिद्धी चांगल्या प्रकारे होत आहे. शासनाच्या विविध योजना तळागाळातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी संवाद वारी सारखे उपक्रम महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

## ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’चा शुभारंभ



**पंढरपूर : 'संवाद वारी' या प्रसिध्दी पत्रकाच्या प्रकाशन प्रसंगी मुख्यमंत्री शिंदे , मंत्री चंद्रकांत पाटील यांना दाखवताना अधिकारी.**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे आयोजित 'संवाद वारी' या शासकिय योजनेच्या प्रदर्शन स्टॉलला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देऊन योजनांची प्रसिध्दी कशा पध्दतीने केली जात आहे याची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर संवाद वारी हा उपक्रम पुणे येथून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी व जगद्गुरु श्री तुकाराम महाराज पालखी यांच्या समवेत शासकिय योजनांची प्रसिद्धी करत इथपर्यंत आलेला आहे. त्यामुळे या पालख्या समवेतच्या प्रवासातील विसावा व मुक्कामाचे ठिकाणी व पालखी मार्गात येणाऱ्या विविध गावातील नागरिकापर्यंत शासकिय योजना पोहोचवण्यास मदत झालेली आहे. माझी लाडकी बहीण योजना ही अशा प्रसिद्धीमुळेच तळागाळापर्यंत पोहोचत आहे. माहिती विभागाचे प्रचार प्रसिद्धीचे कामही चांगले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माहिती उपसंचालक श्री पाटोदकर यांनी माहिती विभागाच्या संवादवारी या उपक्रमाची सविस्तर माहिती मुख्यमंत्री महोदयांना दिली तसेच या प्रदर्शन स्टॉलमध्ये लावण्यात आलेल्या विविध योजनांविषयी माहिती दिली. माहिती विभागामार्फत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रसिद्धीही चांगल्या प्रकारे केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संवाद वारी उपक्रमातील विविध योजनांची पाहणी केली व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सर्व दूर पोहोचवून एकही पात्र बहिण या योजनेपासून वंचित राहणार नाही याबाबत योग्य नियोजन करावे, असेही त्यांनी सूचित केले.

# बचत गट महिलांच्या आर्थिक व्यवस्थापनाचा कणा : पवार

✔ दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्र येऊन आपल्या कौटुंबिक, शैक्षणिक तसेच आरोग्याच्या बाबतीत येणाऱ्या अडचणी सोडवू शकतात, असे सांगून बचत गट महिलांच्या आर्थिक व्यवस्थापनाचा कणा असल्याचे प्रतिपादन मार्ग फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार यांनी केले.

मार्ग फाउंडेशनच्या वतीने महिला बचत गट सक्षमीकरण आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यशाळा व पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि ग्रामीण कौशल्य विकास योजना ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा प्रसंगी मार्ग फाउंडेशन चे संतोष पवार बोलत होते.

पैशांचा योग्य वापर आणि बचत कशी करायची याचा ताळमेळ कसा ठेवायचा हे माता-भगिनींना माहिती असते. यामुळे महिलांनी स्वतः आर्थिक साक्षर व्हावे, त्यानंतर त्यांनी इतर महिलांनाही साक्षर बनवावे. तसेच बचत गटांची व्याप्ती वाढवावी व सरकारच्या बचत गटासाठी असलेल्या सर्व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मिटकॉनचे चंद्रकांत लोंढे यांनी केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि ग्रामीण कौशल्य विकास योजना कार्यक्रमाला पंडित दीनदयाळ उपाध्याय कौशल्य विकास योजनेचे जिल्हा समन्वयक शिवाजी सावळे यांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना सावळे यांनी, पंडित दीन दयाळ उपाध्याय आणि ग्रामीण कौशल्य विकास योजनेचे संपूर्ण माहिती दिली. ही योजना गरजू व बेरोजगार मुलांपर्यंत पोहचण्यासाठी मार्ग फाउंडेशनच्या माध्यमातून देखील प्रयत्न करा, असे आवाहन देखील यावेळी सावळे यांनी केले. सदर कार्यक्रमांला माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांची प्रमुख उपस्थिती होती,तर माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांनी बोलताना महिला-भगिनींनी स्वत:च्या कर्तृत्वावर व्यवसायभीमुख होऊन मार्ग फाउंडेशन च्या माध्यमातून स्वयंप्रेरीत होऊन संतोष पवार याना साथ द्यावी असे आवाहन केले.



**दक्षिण सोलापूर :** बचत गटाच्या माध्यमातून महिलांना मार्गद्रशन मार्ग फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार.

# श्री धानलिंगेश्वर महाराजांच्या पुण्य स्मरणोत्सवानिमित्त कार्यक्रम

✔ दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी




दक्षिण सोलापूर तालुक्यातील श्री क्षेत्र दिंडूर येथील परम पूज्य सदगुरु श्री धानलिंगेश्वर महाराज यांचा शुक्रवार दि. २६ जुलै २०२४ रोजी २२ व्या पुण्य स्मरणोत्सव समारंभ संपन्न होत आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २५ जुलैपर्यंत हे कार्यक्रम होणार आहेत, अशी गुरु धानलिंगेश्वर सार्वजनिक विश्वस्त मंडळाच्यावतीने देण्यात आली. रोज पहाटे ५ वाजता सदगुरु धानलिंगेश्वर महाराजांची नामस्मरण फेरी गावातील प्रमुख मार्गाने सुरु आहे. १५ जुलै रोजी र धानलिंगेश्वर महाराजांची प्रतिमा पूजन व लच्याण सिध्दलिंग महाराज महापुरणाचे उद्घाटन वेदमूर्ती बसवराज शास्त्री ( सोमेश्वर मठ, तीर्थ) व तडवळचे शिवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. पुराणकर वेदमूर्ती मृगेंद्रशास्त्री उंबराणी यांच्या अमृतवाणीने पुराण सुरु असून, हे पुराण २४ जुलैपर्यंत चालणार आहे.

शुक्रवार दि १९ व शनिवार दि २० जुलै रोजी लाल बहादूर शास्त्री प्रशाला व जिल्हा परिषद मराठी शाळेतील शिक्षक वृंद आयोजित विविध क्रीडा व रांगोळी स्पर्धा शुक्रवारी दुपारी तीन ते पाच व शनिवारी सकाळी ९ ते ११ पर्यंत होणार आहे.

२१ जुलै २०२४ रोजी सकाळी ९ वाजता कुंभारी येथील अश्विनी रुरल मेडिकल कॉलेज हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर ब्लड बँकेच्या सौजन्याने रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर होणार आहे. याचे उद्घाटन बाजार समितीचे उपसभापती श्रीशैल नरोळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. गुरुवार २५ जुलै २ रोजी श्री धानलिंगेश्वर महाराज मठ सोलापूर ते दिंडूरपर्यंत भजन मंडळ समवेत पालखी काढण्यात येणार आहे. सुलेरजवळगे, रामनहळळी, वागदरी, केगाव, कुमठे, तडवळ, शेगाव, सोलापूर येथील श्री धानलिंगेश्वर महाराज मठातील भजन मंडळाचे दिंडूर येथे आगमन. त्याचदिवशी रात्री ९ ते पहाटे ६ पर्यत जागरण कार्यक्रमासाठी महालिंगेश्वर गायन संघ मुतुर (ता. जमखंडी, जि. बागलकोट) येथील मुख्य गायिका अक्षता व सहकारी त्यांचे संघ आणि अमोगसिद्ध गायन संघ जिगजेणी ( ता. हिंदी , जि. विजयपूर) याचे मुख्य गायक लक्ष्मण मास्तर व त्यांचे सहकारी यांच्यात भजन कार्यक्रम रंगीतदार ठरणार आहे.

कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा. असे आवाहन धानलिंगेश्वर सार्वजनिक विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले.

### २६ रोजी समाधीस महामंगलारती व पुष्पवृष्टी

शुक्रवार, २६ जुलै २ रोजी समरणोत्सव समारंभ दिवशी पहाटे ५ वाजता ग्रामदैवत श्री नागनाथ महाराज लिंगास व श्री धानलिंगेश्वर महाराज मूर्तीस रुद्राभिषेक व सकाळी ९ वाजता धानलिंगेश्वर महाराज समाधीस महामंगलारती व पुष्पवृष्टी होणार आहे. सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत पालखी मिरवणूक निघणार आहे. सकाळी ११:१५ वाजता महाराजांचे प्रतिमा पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी, एम के फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांच्या हस्ते यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर ष ब्र वीर महंता शिवाचार्य महास्वामीजी, श्री महांतेश्वर मठ चिनमगेरी यांच्या दिव्य सानिध्यात काला कार्यक्रम होणार आहे.


## सहवेदना



### कृष्णाई अंधारे

✔ **अकलूज** : संग्रामनगर (ता.माळशिरस) येथील श्रीमती कृष्णाई गोविंदराव अंधारे (वय ९५) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात तीन मुले,एक मुलगी,सूना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे.अकलूज येथील सुमित्रा पत संस्थेचे चेअरमन महादेवराव अंधारे यांच्या त्या आई होत.

---



### बळीराम बारबोले

✔ **माढा** : दारफळ (सिना) येथील रत्नदीप बारबोले यांचे वडील बळीराम बारबोले यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा जगप्रसिद्ध चित्रकार रत्नदीप बारबोले, सुन, नातू, नात आणि तिन मुली असा परिवार आहे.

# माळशिरस वन विभागातर्फे पालखी सोहळ्यात बिजगोळे वाटप

✔ वेळापूर/प्रतिनिधी

सोलापूर वनविभाग सोलापूरच्या वतीने अमृत वृक्ष आपल्या दारी , एक पेड मां के नाम याअंतर्गत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा माळशिरस येथे आला असता खुडुस येथे वनविभाग व सामाजिक वनीकरणाच्या वतीने वारकरी बांधवांना बीज गोळे वाटप करण्यात आले.

सोलापूर वन विभाग व सामाजिक वनीकरण यांच्या संयुक्त विद्यमाने पालखी मधील



**वेळापूर : खुडूस येथे सोलापूर वन विभाग व सामाजिक वनीकरण यांच्यावतीने वारकरी बांधवांना बीज गोळे व अन्नदान वाटप करण्यात आले.**

वारकऱ्यांना बीज गोळे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जवळपास ३० हजार बिजगोळे वाटप करण्यात आले. यामध्ये करंज, लिंब, हिरडा, बेडा, सीताफळ, जांभूळ, बांबू अशा वृक्षांचे बिजगोळे देण्यात आले. सहाय्यक वनसंरक्षक बाबासाहेब हाके व सहाय्यक लागवड अधिकारी आटोळे, माळशिरस वनपरिक्षेत्र अधिकारी दयानंद कोकरे, माळशिरस लागवड अधिकारी ससाने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम पार पडला. यावेळी वारकरी बांधवांना अन्नदानाची देखील सोय करण्यात आली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व वनपाल, वनरक्षक व सर्व कर्मचारी स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून

# तिरुपती बालाजीच्या धर्तीवर पंढरपुरात टोकन दर्शनाची सोय

दरम्यान मुख्यमंत्री शिंदे यांनी महापूजेवेळी बा विठ्ठला... बळीराजाला सुखी ठेव, कष्टकऱ्यांच्या व सामान्यांच्या जीवनात समृद्धी येऊ दे... असे विठ्ठलाकडं साकडे घातले. आषाढी एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची महापूजा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक केली. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आरोग्य मंत्री डॉ तानाजी सावंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, स्वास्थ परिवार मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार समाधान आवतडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व अन्य मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, हे सरकार सर्वसामान्याचे आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनात सुख समृद्धी येण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आजच्या दिवशी पांडुरंगाला एकच प्रार्थना आहे की राज्यातील शेतकरी, कामगार व कष्टकरी सुखी झाला पाहिजे. यासाठी हे शासन सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मोफत तीन गॅस सिलेंडर योजना, बेरोजगार तरुणांसाठी अप्रेंटिस योजना आदी योजनेच्या माध्यमातून शासन सर्वसामान्यांचे जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करत आहे, असे त्यांनी सांगितले.

### श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने देण्यात येणारे श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार खालील प्रमाणे देण्यात आले. संत तुकाराम महाराज वंशज देहूकर दिंडी श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, देहू यांना एक लाखाचा प्रथम पुरस्कार मिळाला. दानेवाला निकम दिंडी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पुणे यांना ७५ हजार रुपयांचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला तर श्री गुरु बाबासाहेब आजरेकर दिंडी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा, इंदापूर यांना ५० हजार रुपयांचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. या सर्व पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

### आरोग्यदूतचे प्रकाशन

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने प्रतिवर्षी प्रकाशित करण्यात येणारे आरोग्यदुत या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मेगडंबरीसाठी दोन कोटी ४५ लाख रुपयाचे चांदी दान करणाऱ्या उद्योजक सुनील मोरगे यांच्याही यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रारंभी आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नी सौ. लता एकनाथ शिंदे यांच्या हस्ते महापूजा संपन्न झाली.

# मराठा आरक्षणाचे सर्वेक्षण करणाऱ्या २७० प्रगणकांचे मानधन रखडले

### मागील ६ महिन्यांपासून पाठपुरावा

✔ **सांगोला** : मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मराठा समाज सोबत खुला प्रवर्ग व मागास कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या कामी नेमणूका केलेल्या प्रगणक यांनी दिलेल्या वेळेत सर्व्हे पूर्ण करून दिला असतानाही सुमारे २७० कर्मचाऱ्यांचे मानधन मागील ६ महिन्यापासून रखडले आहे. यामध्ये तालुक्यातील ३० सुपरवायझर यांचे मानधन जमा झाले असले तरी, प्रगनक मात्र मानधनाच्या प्रतीक्षेत आहेत. शासनाकडून तात्काळ यांचे मानधन देण्यात यावे अशी मागणी जोर धरत आहे.

सांगोला तालुक्यातील सर्वेक्षण कामासाठी प्रगणकांना मराठा समाज प्रति कुटुंबासाठी १०० रुपये तर इतर कुटुंबासाठी १० रुपये प्रमाणे मानधन व पाचशे रुपये प्रशिक्षण भत्ता देण्यात येणार होता. या मानधनाच्या भरोशावर तालुक्यातील २%० प्रगनक यांनी घरोघरी जाऊन सर्व्हे केला. भर उन्हात घर न घर फिरून योग्य माहिती जमा करून शासन स्तरावर जमा केली. दरम्यान तीस सुपरवायझर यांनी यांच्याकडून ते काम करून घेतले. परंतु या सर्व केलेल्या कामाचे मानधन अद्याप मिळालेले नसल्याने प्रगनक यांच्याकडून संताप व्यक्त केला जात आहे.

मराठा आरक्षण संदर्भात महाराष्ट्र राज्यांमध्ये एकाचवेळी जानेवारी व फेब्रुवारीमध्ये सर्वेक्षण करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. ते सर्व्हेक्षण करत असताना अनेक अडचणींना तोंड देत प्रगणकांनी यशस्वीपणे आपले कर्तव्य पार पाडले. या सर्व्हेक्षणासाठी मानधन देण्यात येईल याबाबतची कल्पना प्रशिक्षण सत्रांमध्ये देण्यात आली होती. मात्र, सर्व्हेक्षण होऊन जवळजवळ ६ महिने होत आले आहेत. मात्र,कोणतेही मानधन प्रगणकांना प्राप्त झालेले नाही. मानधन लोकसभा निवडणुकी पूर्वी मिळावे तसेच थेट बँक खात्यात मानधन जमा करावे; अशी मागणी करण्यात आली होती. दरम्यान सुपरवायझर यांचे मानधन जमा झाले परंतु प्रत्यक्षात कामावर असणाऱ्या प्रगनक यांचे मानधन मागील सहा महिन्यापासून रखडले आहे. त्यामुळे याकडे तातडीने लक्ष घालून प्रगणकांना त्यांचे मानधन त्वरित मिळावे अशी मागणी केली जात आहे.

# भक्ती, शक्ती, धर्म-संस्कारावर इंदुरीकर महाराजांचे प्रबोधन

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ वर्धापन दिनाचे सहावे पुष्प

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

सध्याच्या विविध घडामोडीवर वृत्ती, वल्ली व कृती बाबत सडेतोड व परखड विचार राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर यांनी व्यक्त केले. त्यांच्या कीर्तन कार्यक्रमास भव्लाट श्रोत्यांच्या गर्दीने संपूर्ण परिसर व्यापून गेलेला होता. भक्ती, शक्ती, धर्म-संस्कार प्रबोधन या त्रिवेणी संगमात लाख भक्तजनांना आनंदाचे डोही आनंद तरंग अशी अनभुती दिली. प्रचंड गर्दीमुळे न्यासाचा परिसरात ठिकठिकाणी स्क्रीनद्वारे प्रक्षेपण करण्यात आले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३७ वा. वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक उत्सव म्हणजे स्वामी भक्तांना मिळणारी उर्जा आहे. या कार्यक्रमाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष असून, न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. मंगळवारी सायंकाळी ७ वाजता राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांच्या किर्तन’ कार्यक्रमाने ६ वे पुष्प संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

श्रींची प्रतिमा, नटराज, व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी राज्यमंत्री सिध्दराम म्हेत्रे, माजी जि.प.सभापती मल्लिकार्जुन पाटील, धाराशिवचे माजी जि.प.सभापती मुकुंद डोंगरे, माजी प.स.सदस्य धनेश अचलेरे बोरामणी, माजी उपनगराध्यक्ष अशपाक बळोरगी, निवृत्ती महाराजांचे स्वीय सहायक किरण साठे, आबा कापसे हे उपस्थित होते. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. या कीर्तनाला श्री स्वामी समर्थ वारकरी शिक्षण संस्था चीखुर्डा ता.जि.लातूरच्या वारकऱ्यांनी साथ दिली.



**अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कीर्तनावेळी हभप इंदुरीकर महाराज.**

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, संगीता भोसले व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, विश्वस्त राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, डॉ.मनोहर मोरे, प्रा.प्रकाश सुरवसे, अरविंद शिंदे, अँड.संतोष खोबरे, ओंकारेश्वर उटगे, राजाभाऊ निकम, मनोज निकम, स्वामीराव सुरवसे, प्रकाश पडवळकर, बाळासाहेब मोरे, सायबण्णा जाधव, वैभव नवले, विश्वनाथ देवरमनी, बसवराज धनशेट्टी, योगेश कटारे, प्रशांत बिराजदार, प्रा.शरणप्पा अचलेर, अप्पा हंचाटे, पिंटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, महादेव अनगले व राजेंद्र पवार, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, प्रसन्न बिराजदार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, गणेश पाटील, प्रीतीश किलजे, सिध्दाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिकार्जुन कोगाणुरे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले.

### सद्य स्थितीवर खडेबोल

राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्त महाराज यांनी संत तुकाराम, एकनाथ, निवृत्ती महाराज, ज्ञानदेव, मुक्ताबाई, सोपान व ज्ञान, देव, ध्यान, नम्रता, लक्ष्मी,मी पणा, संपत्ती, दया, संत देव, सुख समाधान याबाबत उदाहरणासह अभंगातील दाखला देत मन मुराद, उपस्थितांनी टाळ्यांचा गजरात सद्य स्थितीवर त्यांनी परखडपणे समाज प्रबोधन केले. श्रीक्षेत्र अक्कलकोट हे गुरु पीठ आहे. या गुरु पिठात अन्नछत्राच्या माध्यमातून सुरु असलेले महाप्रसादा बरोबरच विविध उपक्रमाचे कौतुक केले.

---

दि. १७ जुलै रोजी बुधवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत महाराष्ट्राचे हास्य जत्रा सादरकर्ते समीर चौगुले, ओंकार राऊत, ईशा डे, प्रसाद खांडेकर, चेतन भट, अरुण कदम, प्रभाकर मोरे, वनित खरात, नम्रता संभेराव, शाम राजपूत, पृथ्वीक प्रताप यांचा धमाल उडवणारा कार्यक्रम होणार आहे.